# पुणे शहरांतील जकात व व्यापार

(कै.) शां. वि. आवळसकर, मा. द. आपटे

जिन्नसांची ने आण करणारे व त्यांचा व्यापार करणारे यांचे कडून मालावरील कर म्हणून जकात या नावाचा कर घेण्याचा शिरस्ता अठराव्या शतकाच्या अगोदरपासून मोंगली सुभ्यांतून (मोगलांच्या राज्यांतील मुलुख) रूढ होता. त्याचप्रमाणें शिवाजीनें स्थापिलेल्या स्वराज्याच्या मुलुखांतही वरील प्रकारचा शिरस्ता चालू होता. [१] सामान्यत: या प्रकारचा कर लहान मोठ्या बाजारपेठांतून व ज्या मार्गानें मालाची वाहतूक चाले त्या ठिकाणीं जकात नाकी उभारून वसूल केला जाई. हरत-हेच्या जिनसावर जकात आकारलेली आढळून येते. [२] पुण्यासंबंधांत असेंही दिसून

१. Administrative system of the Marathas by Surendranath Sen, second edition – 1925, pp. 324-330 and 627-630

२ [ फेरिस्त ८२ रुमाल नं १५७ पेशवे दप्तर. अप्रकाशित ]

लष्कराला सर्वतऱ्हेचा माल लागतो, त्याप्रमाणे पुण्याजवळ महादजी शिंदे याच्या लष्कराचा तळ होता. येथे कोकण, मुंबई, पंचमहाल कर्डेरांजणगांव इत्यादी भागांतून हरतऱ्हेचा माल आला. त्याचा तपशीलवार जकात वसुलीचा हिशेब सरकारांत जकात-कमाविसदारानें पाठविला. त्यातील जिन्नसांची तऱ्हा दाखविणारा तपशील तेवढा येथें घेतलेला आहे. हा १७९२-९३ सालचा म्हणजे शके १७१४-१७१५ चा हिशेब आहे.

" सदरहूप्रमाणे सरकारांत लेहून दिल्हे

हिसेब आकार नि॥ महादजी सिंदे यांचे लस्करांत हरजिन्नसांचे बैल आले त्याचा जकात प्रां पुणे व जुन्नर सु॥ सलास तिसैन मया अलफ ( १७९२-९३ ) ई॥ छ १४ रौनल कार्तिक व॥ १ ता॥ छ १२ राखर कार्तिक शु॥ १५ सन आर्बा तिसैन आधिक सुधा तेरमाही जमाई आकार मु॥ पुणे तल वानवडी रुो.

१७६१४५८॥ आवर्दे कोकण व मुंबई
१७६१।॰ ।॥ भुसार बैल ४६९६।॥ दर .।= प्रो
२३४४।॥ तांदुळ बैल ४६८९॥ दर ॰॥॰ प्रो
१८ कापड बैल दर १।= प्रो
कातडी बैल १११॥ दर १। प्रो
तंबाखू बैल २ दर १।= प्रो
॰।॰ नारल बैल ॰॥॰ दर ॰॥॰ प्रो
३६। बंदुखाचे बैल २९ दर १। प्रो
१॥ गलित बैल ४ दर ॰।=
१६०।॥ ≡ जोडी ११७ दर १।=
३५ मीठ बैल ७० दर ॰॥॰
१८० मोहोफुले बैल १४४ दर १। प्रो
१० लाकडे गाडे १० दर १ प्रो
१५ बोंबील बैल १२ दर १। प्रो
४० बकरी सुमार ८०० सेकडा दर ५ प्रो

४७४५८॥